## कायदेशीर प्रक्रियेचा विलय

बलात्कार प्रकरणातील चार आरोपींना पोलिसांनी 'चकमकी'त ठार केल्यानंतर पोलीस दलाला व तेलंगण राज्य सरकारला काही प्रमाणात 'विश्वासार्हता' कमावता आली. त्याच वेळी बलात्कार पीडितेच्या पालकांसह अनेकांना सूड उगवल्याचं समाधान लाभलं. परंतु, आरोपींना अशा तऱ्हेने मारल्यामुळे कायद्याची अंमलबजावणी करणारे पोलीस आणि कायद्यासंबंधी निवाडा करणारी न्यायव्यवस्था यांच्यातील तीव्र अंतर्विरोध निर्माण झाले आहेत. एका बाजूला, विधिमंडळ सदस्य व राजकीय नेते यांच्यातील भेदही या प्रकरणावेळी पुसट झाले. राज्यघटनेने आखून दिलेल्या सुस्थापित प्रक्रिया लक्षात ठेवून कायद्याचा आशय निश्चित करण्याचं काम विधिमंडळ सदस्यांनी करणं अभिप्रेत असतं. या घटनादत्त प्रक्रियांनुसार स्वतःच्या क्रिया व प्रतिक्रियांसाठीचा तर्कविवेक या सदस्यांनी उभा करायचा असतो. कायद्याच्या उचित प्रक्रियेच्या चौकटीमध्ये त्यांनी स्वतःची सार्वजनिक अभिव्यक्ती मांडणं अपेक्षित असतं. कायदानिर्मितीवेळी विधिमंडळ सदस्य या प्रक्रियेत सहभागी होतात. परंतु, सदर प्रकरणामध्ये काही विधिमंडळ सदस्यांनी कायद्याच्या योग्य प्रक्रियेला छेद देणारं वर्तन केलं. बलात्काराच्या चार संशयित आरोपींना पोलिसांनी तत्काळ जीवे मारल्यानंतर या विधिमंडळ सदस्यांच्या प्रतिक्रिया कायद्याचा अनादर करणाऱ्या होत्या.

घटनात्मक नैतिकतेचा अवमान करणाऱ्या या प्रतिक्रियांमधून विधिमंडळ सदस्यांचं पक्षपाती राजकारण्याचं खरं रूपही उघड झालं. 'नागरी समाजा'च्या अनेक सदस्यांप्रमाणे या राजकीय नेत्यांनी सूडभावनेच्या लाटेवर स्वार व्हायचं ठरवलं. पोलिसांनी केलेल्या 'घाईगडबडी'च्या कारवाईसंदर्भात या विधिमंडळ-सदस्यांकडून किमान कायद्याच्या योग्य प्रक्रियेचा आदर करावा अशी अपेक्षा असते. पोलीस व विधिमंडळ सदस्य या दोघांनीही कायदेशीर प्रक्रियेचं किमान पालन करायला हवं होतं. राज्यघटनेशी बांधील राहाण्याची शपथ विधिमंडळ सदस्य घेतात, पण राज्यघटनेच्या नैतिक प्रेरणेचाच ते अनादर करताना दिसले. पोलिसांची कृती अधिकाधिक साशंकता निर्माण करणारी ठरली आहे आणि त्यांच्या कृतीवरील मर्यादाही कमकुवत होत गेल्या आहेत. कायद्याची योग्य प्रक्रिया टाळून पोलिसांनी ही मनमानी कारवाई केल्याचं मत अनेक विख्यात कायदेतज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे.

बलात्कारातील आरोपींना पोलिसांनी ठार केल्यामुळे पोलिसांची कृती आणि भारतीय न्यायव्यवस्थेची विमर्शात्मक कृतिशीलता यांमध्येही तीव्र संघर्ष उत्पन्न झाला आहे. 'पोलिसांच्या कारवाई'द्वारे अशा कृतिशीलतेचा अवकाशच काढून घेण्याचा प्रयत्न झाला, शिवाय न्यायव्यवस्थेच्या वैधतेलाही दुय्यम लेखलं गेलं. कायदेशीर प्रक्रियेला सहायक ठरेल अशी तपासपक्रिया पोलिसांनी काळजीपूर्वक हाताळली नाही, असं या कारवाईतून सूचित होतं. तज्ज्ञांनी म्हटल्याप्रमाणे, तत्काळ कारवाई केल्याने कायदेशीर व घटनात्मक प्रक्रियेला छेद गेला आहे. कायद्याविषयी सजग असलेल्या जनतेकडून वैधता प्राप्त करणाऱ्या आशयघन योग्य प्रक्रियेवर याचे विपरित परिणाम होतील.

आशयघन योग्य प्रक्रियेमध्ये पोलिसांनी केलेल्या कृतीचं किंवा विधिमंडळ सदस्यांनी दिलेल्या प्रतिक्रियेचं पुरेसं कारण देणं आवश्यक असतं. योग्य प्रक्रियेच्या आशयघन संकल्पनेनुसार, पुरेसं कारण देण्यासाठी न्यायव्यवस्था अथवा वकिलांना काटेकोर प्रक्रिया पार पाडावी लागते. पुराव्यावर आधारित निवाडा देण्यासाठी त्यासंबंधी पुरेसे युक्तिवाद व्हावे लागतात, समर्थनं द्यावी लागतात. अशी प्रक्रिया पार पाडल्यानंतर आरोपी दोषी आढळला, तर तो कठोर शिक्षेस पात्र ठरतो. परंतु, पोलिसांच्या कारवाईने या अशा युक्तिवादाच्या प्रक्रियेचा गळाच आवळून टाकला, त्यामुळे दोषींना शिक्षा करण्याचा अधिकार न्यायव्यवस्थेला उरला नाही. त्यामुळे अनेक आघाडीच्या वकिलांनी पोलिसांच्या कारवाईबाबत गंभीर आक्षेप नोंदवले. कायद्याची योग्य प्रक्रिया व राज्यघटना यांच्याबाबत पुरेशी बांधिलकी अजूनही न दाखवणाऱ्या सर्वसामान्य जनतेला सजग बनवण्याची शक्यताही पोलिसांच्या कारवाईने पुसून टाकली. यातून एक प्रश्न उपस्थित होतो : कायद्याच्या राज्याविषयी लोकांच्या मनात आदर निर्माण करेल अशी सभ्य संस्कृती जोपासण्यात पोलिसांना रस आहे का? या संस्कृतीमध्ये पोलिसांनाही कायद्याबाबत उत्तरदायी असावं लागेल. फौजदारी खटल्यांमधील कारवाईसाठीचा तर्क घटनादत्त प्रक्रियांमधून उभा करावा लागेल. परंतु, पोलिसांनी काही असा तर्कविवेक पाळल्याचं दिसत नाही. 'आत्मसंरक्षणा'साठी पोलिसांना आरोपींवर गोळ्या चालवाव्या लागल्या, हे समर्थन ठोस नाही, कारण ही कृती करणाऱ्यांव्यतिरिक्त तिथे दुसरा कोणीही साक्षीदार नव्हता. ●

---

## नागरिकत्व (दुरुस्ती) विधेयकाची उलटतपासणी

*भारतीय समाजाच्या वैविध्यपूर्ण पायाला सुरुंग लावणारे अनेक घटक 'नागरिकत्व विधेयका'त आहेत.*

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये 'नागरिकत्व (दुरुस्ती) विधेयका'ला मंजुरी मिळाली आहे. परंतु, हे विधेयक राज्यघटनेच्या पायाभूत रचनेच्या विरोधात जाणारं असून देशाची सामाजिक वीण धोक्यात आणणारं आहे. सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) बहुसंख्याकवादी आणि ठरावीक समाजघटकांना वगळणाऱ्या हिंदुत्ववादी राजकीय प्रकल्पासाठी हा कावेबाज कायदा अतिशय महत्त्वाचा आहे. कोण भारतीय आहे किंवा भारतीय असणं म्हणजे काय, या प्रश्नाचं भेदभावजन्य व मनमानी उत्तर देणारा हा कायदा आहे. भारतीय राज्यघटनाकर्त्यांनी नागरी-प्रादेशिक नागरिकत्वाची संकल्पना स्वीकारून या प्रश्नाचं आधुनिक व प्रबुद्ध उत्तर देऊ केलं होतं, परंतु विद्यमान सत्ताधारी पक्ष स्वतःचा विचारसरणीय वारसा चालवत कालबाह्य अस्मितावादी संकल्पना प्रस्थापित करू पाहतो आहे. हा उपहास आश्चर्यकारक नसला तरी क्रूर आहे. छळ होणाऱ्या अल्पसंख्याकांबाबत मानवतावादी आस्था दाखवत असल्याचा आव आणत हे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न भयानक आहे. सत्ताधारी पक्षाच्या या मानवतावादी दाव्यांची उलटतपासणी केल्याने त्यांची खरी उद्दिष्टं उघड होतील. ही उद्दिष्टं घटनात्मक लोकशाहीच्या विरोधात जाणारी आहेत.

पाकिस्तान, बांग्लादेश व अफगाणिस्तान या देशांमधील धार्मिक छळापासून बचाव करण्यासाठी स्थलांतरित झालेल्या हिंदू/शीख/ख्रिस्ती/पारशी/बौद्ध/जैन लोकांना नागरिकत्व देणं, हे सदर कायद्याचं उद्दिष्ट वरकरणी वेदनाशामक वाटू शकतं आणि सुटं पाहिलं तर प्रशंसनीयही भासू शकतं. परंतु, विशिष्ट समुदायांना व शेजारी देशांना यातून वगळण्यात आलेलं आहे, त्यामुळे या कायद्यामागील नैतिक तर्काविषयी व घटनात्मक वैधतेविषयी अनेक प्रश्न उपस्थित होतात. या कायद्यासंदर्भात निवडण्यात आलेले तीनही शेजारी

देश इस्लामी प्रजासत्ताक आहेत किंवा इस्लाम हा त्यांचा शासकीय धर्म आहे, त्यामुळे उपरोक्त सहा समुदायांना तिथे धार्मिक छळाचा धोका सहन करावा लागतो, असं समर्थन देण्यात आलं आहे. परंतु, या तर्कानुसार श्रीलंका व भूतान या दोन देशांमधील स्थलांतरितांचाही विचार व्हायला हवा होता, कारण या देशांमध्येही शासकीय धर्म (बौद्ध) प्रस्थापित आहे. श्रीलंकेतून मोठ्या संख्येने आलेले तामीळ (हिंदू व मुस्लीम) स्थलांतरित भारतात निर्वासितांच्या छावण्यांमध्ये राहात आहेत आणि श्रीलंकेत बहुसंख्याकवादी शक्तींनी अल्पसंख्याक समुदायांना लक्ष्य केल्याच्या घटना घडत आलेल्या आहेत. परंतु, पाकिस्तानातील अहमदिया व अफगाणिस्तानातील हजारा आणि म्यानमारमधील रोहिंग्या अशा मुस्लीम अल्पसंख्याक संप्रदायांकडे अतिशय अनैतिहासिक व पूर्वग्रहदूषित पद्धतीने सरसकट दुर्लक्ष करण्यात आलं आहे. भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १४ अनुसार कायद्यासमोर सर्वांना समान मानण्यात आलं आहे, या पार्श्वभूमीवर धार्मिक निकषानुसार नागरिकत्व बहाल करणारा कायदा वाजवी ठरतो का? शिवाय, छळ झालेल्यांच्या बाजूने उभं राहण्याची मानवतावादी प्रेरणा निवडक असू शकते का? इथेच या कायद्यातील धडधडीत आणि बहुधा जाणीवपूर्वक कायम ठेवलेला पेच उघड होतो. या कायद्यात धार्मिक छळाचं स्पष्टीकरण दिलेलं नाही किंवा अशा कोणत्याही छळाचं प्रत्यक्ष मूल्यमापन करून त्यावर हा कायदा आधारलेला नाही. छळ झालेल्यांबाबतची कणव, हे उद्दिष्ट असतं, तर या कायद्याच्या कक्षेत व्यापक अल्पसंख्याक अत्याचारितांचा व समुदायांचा समावेश केला गेला असता. कायद्याच्या सद्यस्वरूपात मात्र काही विशिष्ट समुदायांची यादी देण्यात आली आहे. व्यापक मानवतावादी दृष्टिकोनातून तर अश्रद्ध वा नास्तिक लोकांच्या धार्मिक छळाचाही मुद्दा विचारात घ्यायला हवा आणि छळाचे इतर प्रकारही लक्षात घ्यायला हवेत. यासाठी प्रशासकीय उपाय योजता येणं शक्य होतं किंवा संयुक्त राष्ट्रांच्या सयुक्तिक नियमावल्यांना कायदेशीर चौकटीत जागा करून देता आली असती; त्यासाठी स्वतंत्र कायदा करण्याची गरज नव्हती.

पण तरीही सरकारने असा भेदभावजन्य व मनमानी कायदा मांडला, यावरून हे स्पष्ट होतं की, शेजारी देशांमध्ये छळ होणाऱ्या अल्पसंख्याकांबद्दल या सरकारला कणव वाटत नसून भारतातील अल्पसंख्याक गटांना लक्ष्य करण्याचा विचारसरणीय कल यात प्रतिबिंबित झाला आहे. सत्ताधारी पक्षाला देशभरात राबवायचा असलेला ‘नागरिकांचा राष्ट्रीय नोंदपट’ (नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स : एनआरसी) आणि ‘नागरिकत्व (दुरुस्ती) विधेयक’ यांच्यातही स्पष्ट संबंध आहे. आसाम वा ईशान्येतील इतर राज्यांमध्ये या दोन्हींचे वेगवेगळे पडसाद उमटत असले आणि नोंदपट व नागरिकत्व कायदा यांचे उगम वेगवेगळे असले, तरीही सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी केलेली विधानं बघता, हे दोन्ही संयुक्त प्रकल्प असल्याचं दिसून येतं. राष्ट्रीय नोंदपटामधून वगळण्यात आलं असलं, तरी काही समुदायांना नागरिकत्व दुरुस्ती विधेयकामध्ये सामावून घेण्यात आलं आहे, म्हणजेच विशिष्ट समुदायांना एक पर्याय नाकारला गेला तरी दुसऱ्या पर्यायाद्वारे नागरिकत्व मिळेल, असं आश्वस्त करण्याचा सत्ताधारी पक्षाचा प्रयत्न आहे. या आश्वासनाची कायदेशीर व्यवहार्यता काहीही असली (त्यात उघडपणे अनेक अडचणी येतील), तरी वांशिक-धार्मिक निकषांवर विशिष्ट समुदायांच्या दाव्यांना व अधिकारांना वरचढ स्थान देणारा हा कायदा आहे, एवढं स्पष्ट होतं. दुसऱ्या बाजूला, नागरिकत्व दुरुस्ती विधेयकातून वगळण्यात आलेल्या समुदायांना नागरिकांच्या राष्ट्रीय नोंदपटातही जागा मिळाली नाही, तर त्यांचं अस्तित्व अस्थिर व असुरक्षित होईल आणि आधीच दुय्यम नागरिकाच्या स्थानावर असलेल्या या लोकांना बिननागरिकत्वाच्या किंवा राज्यहीनतेच्या अवस्थेत ढकलून दिलं जाईल,

असाही संकेत या घडामोडींमधून मिळतो आहे. 'परक्यां'ना वेगळं पाडून व लक्ष्य करून बहुसंख्याकांना एकगठ्ठा जवळ आणू पाहण्याचा सत्ताधारी पक्षाचा प्रयत्न विभाजनवादी आणि संकुचित समीकरणांवर आधारलेला आहे. अशा धोरणांमुळे आपल्यासारख्या वैविध्यपूर्ण आणि विषम समाजाच्या अनेक चिरफळ्या उडण्याचा धोका आहे. सातत्याने हातचलाखी करून हे अंतर्विरोध आपण हाताळू शकतो, असा अवाजवी आत्मविश्वास भाजपला आहे. परंतु, आसाममध्ये नागरिकत्व दुरुस्ती विधेयकाविरोधात निदर्शनांचा भडका उडाल्यावर हा आत्मविश्वास काहीसा डळमळल्याचं दिसतं. वैविध्य, विषमता व संघर्ष असे अनेक अक्ष असलेल्या समाजामध्ये बहुसंख्य जनतेला 'परक्यां'विरोधात चेतवणं स्थैर्याला बाधा आणणारं ठरतं, शिवाय प्रयोगशाळेतील प्रयोगांप्रमाणे या धोरणांची अंमलबजावणी नियंत्रित ठेवता येत नाही. उलट, सर्वसामान्य जनतेला दैनंदिन जीवनात हवीहवीशी वाटणारी शांतता व सामाजिक सौहार्द यांचा भंग करणाऱ्या प्रवृत्ती या काळात फोफावतात. बहुसंख्य हिंदूंच्या नावावर सत्ताधारी पक्ष स्वतःचा विभाजनवादी कार्यक्रम रेटतो आहे आणि हिंदूंमधील बरेच मोठे घटक या कार्यक्रमाशी सहमत नसतील. अशा वेळी, सतत वातावरण तप्त ठेवण्याचं सत्ताधारी पक्षाचं कारस्थान थोपवायचं असेल, तर नागरिकत्व दुरुस्ती विधेयक राज्यघटनेतील मूल्यांना बाधा आणणारं आहे, हे बहुसंख्य हिंदूंनी समजून घ्यायला हवं आणि या विधेयकाविरोधात उभं राहायला हवं. ●

## सहअस्तित्वासाठी निदर्शनं

*राज्यघटनेशी असलेल्या बांधिलकीला जागणं सध्या आत्यंतिक निकडीचं झालेलं आहे.*

'नागरिकत्व (दुरुस्ती) अधिनियमा'नंतर सुरू झालेल्या घडामोडींमधून विद्यमान सरकारचा स्वभावधर्म आणि लोकांचं मनोधैर्य या दोन्हींचे दाखले मिळाले. एका बाजूला, या अधिनियमाविरोधात आणि नागरिकांच्या राष्ट्रीय नोंदपटाविरोधात राष्ट्रव्यापी निदर्शनं होत आहेत, त्यात विविध स्तरातील जनतेने उत्स्फूर्तपणे व उत्साहाने सहभाग घेतल्याचं दिसतं. दुसऱ्या बाजूला, सरकारने या निदर्शनांना खास लोकशाहीविरोधी व दडपशाहीच्या पद्धतीने उत्तर दिलं आहे. लोकांच्या घटनात्मक आकांक्षांना पायदळी तुडवू पाहणाऱ्या सरकारच्या धोरणांसमोर या निदर्शनांनी प्रश्नचिन्ह उमटवलं आहे. आपल्या सांप्रदायिक कार्यक्रमासाठी लोकांची मूकसंमती मिळवण्याचा छुपा हेतू असलेल्या सत्ताधारी दुकलीच्या मर्यादाही या निदर्शनांनी उघड केल्या आहेत. परंतु, ईशान्येतील राज्यांमध्ये सुरू झालेल्या आणि देशातील विविध भागांमध्ये- विशेषतः विद्यापीठांमध्ये- पसरलेल्या या लोकनिदर्शनांनी सत्ताधाऱ्यांच्या विघातक भ्रमाचा भोपळा फोडला आहे.

नागरिकत्व (दुरुस्ती) अधिनियम मंजूर झाल्यानंतर लगोलग आसाम, त्रिपुरा व ईशान्येतील इतर राज्यांमध्ये निदर्शनांना सुरुवात झाली आणि जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ व अलीगढ मुस्लीम विद्यापीठ इथल्या हिंसक पोलिसी कारवाईनंतर निदर्शनांचा आणखी भडका उडाला. माध्यमांमधील बातम्यांनुसार, दिल्ली पोलिसांची कारवाई निंदनीय होती, त्यांनी जाणीवपूर्वक जामियाच्या ग्रंथालयात वायूबॉम्ब फोडले, वसतिगृहावर हल्ला केला आणि कथितरित्या विद्यार्थ्यांवर रबर-बुलेटच्या फैरी झाडल्या. अलीगढ मुस्लीम विद्यापीठातील हिंसाचाराच्या बातम्या तितक्याच, किंबहुना जास्तच संतापजनक आहेत. विद्यार्थी शांततापूर्ण मार्गाने निदर्शनं करत असतानाही पोलिसांनी तिथे कारवाई केली. या भागात सार्वजनिक मालमत्तेचं

नुकसान करणाऱ्या काही क्वचित घटना घडल्या असल्या, तरी त्या विद्यार्थ्यांनी केलेल्या नव्हत्या, हे खुद्द पोलिसांनीही नंतर कबूल केलं आहे. तरीही, निदर्शकांनी सार्वजनिक मालमत्तेचं नुकसान केल्याचं कारण दाखवून कारवाई झाली. राज्ययंत्रणेकडून होणारी ही पद्धतशीर दडपशाही सरकारला नैतिक जबाबदारीपासून मुक्त करण्यासाठी होते आहे. गोंधळ माजवण्यासाठी व निंदानालस्तीसाठी केले जाणारे हे सर्व प्रयत्न यशस्वी होत नाहीयेत, असं दिसतं. पोलिसांच्या क्रौर्याला सामोरं जाताना विद्यार्थ्यांनी विलक्षण धैर्य दाखवलं आहे. पोलिसांच्या लाठीमाराला निर्भीडपणे सामोऱ्या गेलेल्या जामियातील विद्यार्थ्यांनी सत्ताधाऱ्यांना कठोर इशारा दिला आहे की, सरकारला लोकांच्या अधिकारांना पायदळी तुडवता येणार नाही. देशभरातील विविध विद्यापीठांमध्ये हजारो विद्यार्थ्यांनी असंच लक्षणीय धैर्य दाखवलं आहे. आत्तापर्यंत राजकीयदृष्ट्या निष्क्रिय राहिलेले लोकही या आंदोलनामध्ये घटनात्मक अधिकारांच्या रक्षणासाठी रस्त्यावर उतरले आहेत. नागरिकत्व दुरुस्ती अधिनियम व नागरिकांचा राष्ट्रीय नोंदपट यांमधील वगळणुकीच्या धोरणांचा विरोध हे निदर्शक करत आहेत.

या देदिप्यमान धैर्याच्या पार्श्वभूमीवर सत्ताधाऱ्यांनी निदर्शनांच्या बदनामीचा प्रयत्न सुरू केला आहे. या निदर्शनांमागील सार्वत्रिक उद्देश सरकार नाकारत असलं तरी मुळात सरकारच्या दाव्यातच विश्वसनीयतेचा अभाव आहे. विशेषतः देशातील सार्वजनिक संस्थांमध्ये महत्त्वाच्या पदांवर असलेल्या व्यक्ती जमातवादी भाषा वापरत आहेत, हे आश्चर्यकारक नसलं तरी घृणास्पद आहे. परंतु, जमातीकरण व धृवीकरण यांसाठी सुरू असलेले त्यांचे प्रयत्न पुढे जाताना दिसत नाहीत, कारण नागरिकत्व दुरुस्ती अधिनियम व नागरिकांचा राष्ट्रीय नोंदपट यांमागचा विभाजनवादी व राज्यघटनाविरोधी हेतू मानवी आणि विवेकी लोकांच्या लक्षात आला आहे. १९ डिसेंबर रोजी झालेल्या राष्ट्रव्यापी निदर्शनांमध्ये ऐक्य व सौहार्दाची कळकळ स्पष्टपणे दिसत होती. या देशातील विविधतेचाच आविष्कार त्यातून झाला आणि राज्यघटनेच्या चौकटीत सहअस्तित्वाची शक्यता अधोरेखित झाली.

समेट साधण्याचा प्रयत्न करणं तर दूरच, पण निदर्शकांशी साधा संवाद साधण्याचीही सरकारची तयारी नाही. उलट, कलम १४४ लादून निदर्शकांवर जबरदस्ती करण्याची भूमिका सरकारने घेतली आहे, दिल्लीत मोबाइल सेवा व मेट्रो स्थानकं बंद करण्यात आली आहेत. सत्ता टिकवण्यासाठी डावपेच म्हणून भयाचा वापर करणं कसं कालबाह्य होत जातं, याची स्पष्ट चिन्हं या वेळी दिसली. प्रतिबंधात्मक आदेश देण्यात आलेले असतानाही, लोकांनी शांततापूर्ण पद्धतीने एकत्र येऊन निदर्शनं करण्याचा स्वतःचा मूलभूत अधिकार बजावला. निदर्शनांवेळी दंगल व हिंसेच्या सर्व घटना भारतीय जनता पक्षाच्या सत्तेखालील राज्यांमध्ये घडल्या, या वस्तुस्थितीचाही सखोल तपास व्हायला हवा. लखनै व मंगळुरू इथे पोलिसांच्या गोळीबारात तीन व्यक्तींचा मृत्यू झाल्याची बातमी आहे. तत्पूर्वी आसाममध्ये निदर्शकांवर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात पाच जणांचा मृत्यू झाला. सरकारने अरेरावी सुरूच ठेवल्यामुळे इतके मूल्यवान मानवी जीव गमवावे लागले, यावरून सत्ताधाऱ्यांचं गंभीर नैतिक अपयश दिसून येतं. लोकशाहीमध्ये अशा प्रकारच्या संघर्षाच्या व संकटाच्या प्रसंगांना वाटाघाटींद्वारे हाताळणं गरजेचं असतं आणि विरोधकांना प्रतीत होणारं सत्य स्वीकारण्याचीही तयारी ठेवावी लागते. अशा प्रकारच्या विमर्शात्मक आणि समेट साधण्यासाठीच्या प्रयत्नांमधून देशातील सततचा तणाव व संघर्ष थोपवता येईल. शांततापूर्ण सहअस्तित्वाची हमी देण्याचं कर्तव्य सरकारला पार पाडता येत नसेल, तर या संदर्भात जनता पुढाकार घेणं स्वाभाविक आहे. सविनय कायदेभंग आणि राज्यघटनेशी बांधिलकी या प्रेरणांनी लोकांमध्ये ऐक्य साधलं जातं आहे, ही आश्वासक गोष्ट आहे. ●

# जगणं स्वस्त, व्यापार महागडा

*भारताच्या 'उद्यमशील' शहरांच्या उभारणीची किंमत गरीब व स्थलांतरित मजुरांना मोजावी लागते.*

भारतीय शहरांमध्ये अपघाती आग लागण्याचे अनेक भयंकर प्रसंग होत आलेले आहेत. रुग्णालयासारख्या ठिकाणी सुरक्षितता व इतर बाजूंकडे काटेकोर लक्ष दिलेलं असावं, अशी अपेक्षा असते, पण तिथेही आग लागल्याच्या बातम्या वेळोवेळी येत असतात. झकपकीत उपहारगृहं, पब व लहान हॉटेलं या ठिकाणीही आगी लागतात आणि मोठ्या प्रमाणात जीवितहानी होते, मालमत्तेचंही नुकसान होतं. ही यादी मोठी आहे. पण सुरक्षितता व पर्यावरण यांचे सर्व नीतिनियम धाब्यावर बसवणाऱ्या वेगवान नागरीकरणाचे कैवारी उत्सव साजरा करतच राहातात. या प्रक्रियेत 'व्यवसायसुलभता' हाच नियम होतो आणि कामगारांनी काम मिळालंय याबद्दल कृतज्ञता बाळगावी अशी अपेक्षा ठेवली जाते, बाकी कामाची परिस्थिती कशीही असो. कामगारविषयक कायद्यांमुळे उद्योगमालकांच्या मार्गात 'अडथळा' येऊ नये, असा विचार केला जातो, कारण असे अडथळे आले तर कामगारांनाच तोटा होईल, त्यांना रोजगार उपलब्ध होणार नाही, असं सांगितलं जातं.

भारतातील शहरांमधले गरीब व कष्टकरी रहिवासी अतिशय खडतर परिस्थितीत जगतात, काम करतात व प्रवास करतात, याबद्दल त्यांची अनेकदा प्रशंसा केली जाते. मुंबई व दिल्ली यांसारख्या शहरांमधील चैतन्यशीलतेशी या लोकांच्या 'चिवटपणा'ची सांगड घातली जाते. हा विचारच भयंकर आहे : दिल्लीतील अनाज़ मंडी भागात ८ डिसेंबर २०१९ रोजी आगीच्या धुरात घुसमटून प्राण गमावलेले ४३ मजूर ज्या व्यवस्थेला बळी पडले तीच व्यवस्था चैतन्यशील शहरांना प्रगतीची व रोजगाराची केंद्रं मानून त्यांचा गौरव करते. पण कोणत्याही सुरक्षिततेविना आणि प्राथमिक सुविधाही नसलेल्या अवस्थेत सलग काम करावं लागणाऱ्या ठिकाणी जाण्याची निवड या गरीब मजुरांनी स्वतःहून केली असेल का, हा कळीचा प्रश्न आहे. या अपघातात जीव गमावलेले लोक बहुतांशी उत्तर प्रदेश व बिहारमधील स्थलांतरित आहेत. ते कारखान्यात बॅग, कॅप व कपडे तयार करत आणि तिथेच राहात. देशाच्या राजधानीतील एका वर्दळ असलेल्या रहिवासी भागात हा कारखाना होता.

भारतातील नागरी केंद्रांमधील गरीब कामगार व स्थलांतरित मजुरांचा साधनसंपन्नता व चिवटपणा यांचा विपरित अर्थ इथे दिसून येतो. त्यांची कामाची ठिकाणी व्यावसायिक उद्योगाची असतात, परंतु रचनात्मकदृष्ट्या असुरक्षित व हानिकारक इमारतींमध्ये या जागा असतात. नोकरी जाईल या भीतीने हे कामगार तासन्-तास काम करत राहातात. नोकरशाहीमध्ये उत्तरदायित्वाचा अभाव असल्यामुळे आणि सुरक्षिततेचे नियम व पर्यावरणविषयक नियमनं यांबाबत तिरस्कार दाखवला जात असल्यामुळे हे सगळं निर्धोकपणे सुरू राहातं. या अपघाताशी संबंधित कारखान्याचा मालक व व्यवस्थापक यांनी प्रत्येक कायदा व नियमनाचा भंग केल्याचं दिसतं. जगणं स्वस्त झालंय, आणि स्थलांतरित मजुरांचं जगणं तर अगदीच कवडीमोल ठरलेलं आहे. कायदे अतिशय किचकट आहेत, त्यांची अंमलबजावणी करणं आपल्याला शक्य नाही, असं लहान उद्योग म्हणतात. दुसऱ्या बाजूला, 'भरभराटी'ला आलेल्या शहरांना उत्पन्ननिर्मिती व नियमपालन यांच्यात सांगड घालता येत नाही.

यातील प्रत्येक घटक अनाज़ मंडीमधील 'कारखान्या'तील आगीच्या संदर्भात पाहायला मिळतो. वेगवान, अनियोजित नागरीकरण व शहरांची राजकीय अर्थनीती यांसाठीची किंमत गरीब लोक मोजतात. कमी मोबदल्यात उपलब्ध होणारे त्यांचे श्रम या

कारखान्यांचा उत्पादन खर्च कमी ठेवतात. वास्तविक, रहिवासी भागांमध्ये प्रदूषण न करणारे कुटीरोद्योगच कार्यरत राहू शकतात. पण प्रशासन याकडे दुर्लक्ष करतं आणि भारतातील कायदे केवळ कागदी भेंडोळ्यांमध्ये गुंडाळलेले राहातात. अनाज़ मंडीमधील कारखाना 'बेकायदेशीर' होता, त्यामुळे उद्योग व कामगार खात्यांना त्यावर चाप लावता आला नाही, अशी प्रसारमाध्यमांमधून आलेली बातमी तर सर्वांत असंगत आहे. केवळ सरकारकडे नोंदणी झालेल्या कारखान्यांचीच तपासणी करता येते, असं एका ज्येष्ठ सरकारी अधिकाऱ्याचं विधान बातम्यांमध्ये देण्यात आलं होतं.

जमिनीच्या संमिश्र वापराला परवानगी असलेल्या निवासी भागामध्ये अनाज़ मंडीतील ही इमारत उभी होती, असं माध्यमांनी म्हटलं आहे. परंतु, हा संमिश्र वापर केवळ तळ मजल्यावरच करायची परवानगी होती. इथे मात्र संपूर्ण इमारत व्यावसायिक कामांसाठी वापरली जात होती. महानगरपालिका किंवा राज्य सरकार यांपैकी कोणत्याही अधिकारीसंस्थेच्या परवान्याशिवायच हे सगळं सुरू होतं. अग्नी सेवा खात्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र या इमारतीच्या व्यवस्थापनाने घेतलेलं नव्हतं आणि इमारतीच्या आराखड्याला स्थानिक प्रशासनाची मंजुरी मिळालेली नव्हती. या कारखान्यात कामगार झोपत होते तिथेही कागद, प्लास्टिक, रेक्झीन, इत्यादींसारखे ज्वलनशील असलेले व नसलले सर्व पदार्थ निष्काळजीपणे साठवून ठेवल्याचं आढळलं.

आठ डिसेंबर रोजी लागलेल्या आगीनंतर राजकीय पक्ष व राजकीय नेते यांच्यात पीडितांना आर्थिक नुकसानभरपाई देण्याची आणि एकमेकांवर दोषारोप करण्याची स्पर्धा लागली आहे. सर्व सार्वजनिक आपत्ती व अपघातांनंतर उमटणाऱ्या पडसादांमध्ये हा एक अविभाज्य भाग असतो. परंतु, झोपडपट्ट्या व अनधिकृत बांधकामांचं नियमितीकरण करण्याच्या बाबतीत, विशेषतः निवडणुकांच्या काळात, हेच पक्ष व नेते पुढाकार घेतात. अग्नीशमनाची वाहनं व सामग्री यांसारख्या गोष्टींची उपलब्धता कशी होईल, अशा प्राथमिक सुविधांकडे मात्र फारसं लक्ष पुरवलं जात नाही.

अनाज़ मंडी परिसरातील आगीत बळी पडलेल्यांना न्याय मिळवून देण्यासाठी माध्यमांना किंवा नागरी समाजालाही वेळ नाही आणि त्यासाठी कृती करण्याचा कलही या घटकांनी दाखवलेला नाही. यापूर्वी दिल्लीतील उपहार चित्रपटगृहामधील आगीत बळी पडलेल्यांच्या कुटुंबीयांनी अतिशय धैर्याने व चिकाटीने १८ वर्षं कायदेशीर लढा दिला. मात्र अखेरीस त्यांच्या संयमाची व संतापाची चेष्टा करणारा निकाल त्यांच्या पदरात पडला. अनाज़ मंडीमधील पीडितही काहीच दिवसांमध्ये विस्मृतीत जातील. ●

## महामार्गांना गतिमान करण्यासाठी 'फास्टॅग'?

*केवळ इलेक्ट्रॉनिक टोलवसुलीमुळे महामार्गांच्या विकासाला चालना मिळेल का?*

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या रस्तेजाळ्यातील सुमारे पाचशे टोलनाक्यांपैकी जवळपास ९० टक्के मार्गिकांवर टोल भरण्यासाठी 'फास्टॅग' हा 'अनिवार्य' पर्याय १५ डिसेंबर २०१९पासून लागू करण्यात आला आहे. भारतीय महामार्ग व्यवस्थापन कंपनी लिमिटेड आणि विविध व्यावसायिक बँकांच्या सहकार्याने भारतीय राष्ट्रीय देयक महामंडळाकडून चालवल्या जाणाऱ्या इलेक्ट्रॉनिक टोल संकलन व्यवस्थेला 'फास्टॅग' (FASTag) हे ब्रॅण्ड-नाम देण्यात आलं आहे. या व्यवस्थेनुसार वाहनांवर रेडियो फ्रिक्वेन्सी ओळखणारा टॅग बसवला जातो आणि तो त्यांच्या बँक खात्यांशी थेट जोडलेला असतो, त्यामुळे टोलनाक्यांमधील त्यांची

जा-ये रोकडविरहित करता येते. महामार्गांवरील कोंडी कमी करणं, महसुलातील गळती थोपवणं आणि टोलवरच्या विनिमयप्रक्रियेत पारदर्शकता आणणं, हे या व्यवस्थेचे लाभ असल्याचं सांगितलं जातं. परंतु, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणावरचा कर्जाचा डोलारा कमी करून महामार्ग विकासाची वाट सुकर करतील, इतके हे लाभ ताकदीचे आहेत का, हा प्रश्न कायम आहे.

आयसीआरए या पत मोजणी संस्थेच्या आकडेवारीनुसार, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणावरील एकत्रित दायित्वाचा डोलारा सुमारे ६३,००० कोटी रुपये इतका आहे. पण प्रत्यक्षातील आकडा याच्या किमान तीन पट असावा, असं मत खुद्द प्राधिकरणातील काही तज्ज्ञांनी दिलं आहे. त्याचप्रमाणे भारतीय स्टेट बँकेच्या भांडवली बाजारपेठांच्या अंदाजानुसार, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अलीकडच्या प्रकल्पांशी निगडित कर्जविषयक निधीपुरवठा मोठ्या प्रमाणात वाढला आहे, तर टोल संकलन मात्र प्रति किलोमीटर सहा टक्क्यांनीच वाढल्याचं दिसतं- २०१३ साली ५५ लाख रुपये टोलवरून जमा झाले, तर २०१९ साली ८० लाख रुपये या संकलनातून जमा झाले. त्यामुळे टोलद्वारे या प्रकल्पांमधून परतावा मिळणं तर दूरच, त्यासाठी घेतलेल्या कर्जाचं व्याज कसंबसं जमा होतं आहे.

कर्जाचा बोजा वाढण्याला कारणीभूत ठरलेल्या अनेक घटकांमध्ये भूसंपादनासाठी झालेल्या खर्चाचाही समावेश आहे. विशेषतः नवीन 'भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापन यांमधील पारदर्शकता आणि न्याय्य नुकसानभरपाई अधिनियम, २०१३' लागू झाल्यानंतर हा खर्च अधिक वाढला आहे. या कायद्यानुसार जमीनमालकांना देण्यात येणाऱ्या नुकसानभरपाईची रक्कम वाढवण्यात आली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या ताज्या अंदाजी आकडेवारीनुसार, प्राधिकरणाचा जमिनीवरील खर्च २०१६-१७मध्ये १७,८२४ कोटी रुपये इतका होता, तो वाढून २०१७-१८मध्ये ३२,१४३ कोटी रुपये इतका झाला. तरीही, 'राष्ट्रीय महामार्ग' या प्रवर्गात अधिक रस्ते तयार करण्यावर किंवा असलेल्या रस्त्यांमध्ये सुधारणा करण्यावर कोणतीही मर्यादा घातलेली नाही. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या प्रकल्पांचा 'अनियोजित व अवाजवी विस्तार' करण्यावर शेवटी पंतप्रधान कार्यालयाला लाल झेंडा दाखवावा लागला.

गेल्या दशकभराच्या काळात भारतातील सरकारांनी महामार्ग हा विकासाचा दृश्य चेहरा असल्याचं प्रदर्शन सातत्याने केलं, पण रस्तेबांधणीमध्ये खाजगी क्षेत्रातून फारशी मोठी गुंतवणूक झालेली नाही. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण मुख्यत्वे अभियांत्रिकी, खरेदी व बांधकाम या प्रारूपानुसार रस्तेबांधणी करण्यावर विसंबून आहे, आणि या प्रक्रियेत सरकारी तिजोरीवर अधिकाधिक अवलंबून राहावं लागतं. त्यामुळे गेल्या वर्षभरात सरकारचं आर्थिक पाठबळ जवळपास ३६,६९१ कोटी रुपयांनी कमी झाल्यावर, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला २०१९-२० या वर्षासाठीचं कर्ज अनेक पटींनी वाढवावं लागलं. प्राधिकरणावरील सध्याचा कर्जाचा डोलारा ८५,००० कोटी रुपये आहे. अशा प्रकारे कर्ज वाढवल्याने- उदाहरणार्थ, राष्ट्रीय लघुबचत निधीकडून घेतलेलं कर्ज दुप्पट करणं- हे कर्जाचं विषारी चक्रच सुरू होण्याची शक्यता आहे. अशा वेळी प्राधिकरणाने स्वतःच्या महाकाय योजना व उद्दिष्टं यांना वाजवी स्थितीत आणणं गरजेचं नाही का?

इलेक्ट्रॉनिक टोलसंकलनाच्या प्रारूपाद्वारे महसुलात वाढ होत असेल, तरीही वाढलेल्या महसुलाने सरकारी तिजोरीवरचा बोजा कमी व्हायला पुरेशी मदत होईल का, हा प्रश्न या संदर्भात उपस्थित करायला हवा. असं होणार असेल, तर वाढीव महसूल कशासाठी वापरला जाईल- राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी किंवा नवीन बांधकामांसाठी वापरला जाईल का? दीर्घ काळ 'फास्टॅग'चा वापर झाल्यानंतरच हे प्रश्न उपस्थित करता येतील, असं कोणी म्हणून

शकतं. परंतु, इलेक्ट्रॉनिक टोलसंकलनाचा एक आयाम या टप्प्यावर अधिक महत्त्वाचा ठरतो : सरकारी निधीपुरवठ्यावर बांधल्या जाणाऱ्या महामार्गांमधील निर्गुंतवणुकीसाठी व महामार्गांवरील मालमत्तेचं मुद्रीकरण करण्यासाठी सरकारला मदत व्हावी म्हणून टोल-पावत्यांचा डेटा उभा करणं, गरजेचं आहे.

इलेक्ट्रॉनिक टोलसंकलनामुळे रस्त्यांवरील मालमत्तांच्या मुद्रीकरणाला गती मिळेल आणि टोल चालवण्याचं काम जागतिक गुंतवणूकदारांकडे हस्तांतरित करणंही शक्य होईल, असा दावा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून केला जातो आहे. इलेक्ट्रॉनिक टोलसंकलनामुळे महसूलसंकलनाच्या व्यवस्थेत पारदर्शकता येईल, हे मान्य केलं, तरीही डेटाच्या प्रसारातील पारदर्शकतेवर ती अवलंबून असेल. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने आपल्या कृतीमधून अशी पारदर्शकता राखल्याचा पुरावा इतिहासात तरी फारसा सापडत नाही, शिवाय विद्यमान सरकारने अधिकृत आकडेवारीच्या संदर्भात तरी अशी काही पारदर्शकता राखल्याचं दिसत नाही. अलीकडच्या काळात प्राधिकरणाने संमिश्र-वार्षिकी प्रारूप (हायब्रिड-ॲन्युइटी मॉडेल) राबवायचा प्रयत्न केला (त्यात प्रकल्पखर्चाच्या ४० टक्के समन्याय गुंतवणूक सरकारनेच केली होती), परंतु महामार्गांना निधीपुरवठा करण्यासाठी खाजगी गुंतवणूकदार/कर्जदार पुढे आले नाहीत.

खाजगी गुंतवणुकीतील ही मंद गती भारतातील एकंदरच अर्थव्यवस्थेमध्ये दिसते, असा युक्तिवाद कोणी करेलही, पण राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या संदर्भात तरी गतकालीन संस्थात्मक गैरव्यवहारामुळे खाजगी गुंतवणूकदार पुढे येत नसण्याची शक्यता नाकारता येणार नाही. उदाहरणार्थ, महालेखापरीक्षकांनी अलीकडेच संसदेत सादर केलेल्या एका अहवालानुसार, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने खराब प्रकल्प व्यवस्थापनाच्या कारणावरून ४४ कोटी रुपये रोखून धरले आहेत. शिवाय, सीडीएम स्मिथचं वादग्रस्त प्रकरणही आपल्याला विसरता येणार नाही. या प्रकरणात कंत्राटं मिळवण्यासाठी प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना अनुचित सेवाकर परताव्याच्या माध्यमातून लाच देण्यात आली, असा आरोप आहे. अशा प्रकारच्या गैरव्यवहाराची फारशी चौकशीही होत नाही, परंतु हा वारसा लाभलेल्या संस्थेला केवळ इलेक्ट्रॉनिक टोलसंकलनामुळे नक्की कितपत मदत होईल, आणि महामार्ग प्रकल्पांवरील खाजगी गुंतवणूकदारांचा विश्वास यातून वाढेल का, हा प्रश्नच आहे. ●

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाऊंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (दि. १४ आणि २१ डिसेंबर या अंकांतून. 'कायदेशीर प्रक्रियेचा विलय' हे संपादकीय गोपाळ गुरू यांनी लिहिले आहे.)

परिवर्तनाचा वाटसरू

## परिवर्तनाचा वाटसरूसाठी लेखन पाठवताना

आपले लेखन पाठवताना संपादनाच्या सोयीसाठी
ते सुवाच्च अक्षरात लिहिलेले
वा टंकलिखित वा संगणकाद्वारा मुद्रित केलेले असावेत.
मुद्रित लेख एमएस वर्ड अथवा पेजमेकरमध्ये
श्रीदेव ७-०७०८ या अथवा युनिकोड फॉंटमध्ये पाठवावे.